# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 343/2022 दिनांक : 05.09.2022

## 1)खुनः–

**अर्धापूर :–**दिनांक 03.09.2022 रोजी 23.50 वा. चे सुमारास, **रेडचिल्ली धाब्याचे समोर मालेगाव शिवार ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संदिप चंपतराव इंगोले, वय 38 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मालेगाव ता. अर्धापूर जि. नांदेड,** यास यातील नमुद दोन अनोळखी चेहऱ्यावर दस्ती बांधलेले अंगाने सडपातळ वर्णनाचे आरोपीतांनी संगणमत करुन अश्लिल शिवीगाळ करुन आरोपीतांनी त्यांचे हातातील खंजराने व तलवारीने छातीवर, पाठीवर वार करुन गंभीर जखमी करुन खुन केला. वगैरे **फिर्यादी पुजा संदिप इंगोले, वय 32 वर्षे, रा. मालेगाव ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरन 260/2022 कलम 302,294,34 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री अशोक जाधव, मो. नं. 7798834263** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 03.09.2022 रोजी 22.00 वा. चे सुमारास, **महराणा प्रतापसिंह नगर, जुना कौठा येथील गोदाम, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे गोदामातील कारागीरासह हजर असतांना यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन हातात तलवार घेवून फिर्यादीचे जवळ येवून तुने गणपती बेचकर बहोत पैसा कमाया है, मरेको दस हजार रुपये अभी के अभी दे असे म्हणुन खंडणी स्वरुपात पैस्याची मागणी करुन फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने आरोपीतांनी हातातील तलवारीने फिर्यादीच्या अंगावर वार केले असता फिर्यादीने ते वार हुकविले त्यामुळे गोदामासमोर उभी असलेली फिर्यादीची छोटा हत्ती गाडीची समोरची काच फुटून 5000/– रुपयाचे नुकसान केले व मै सिडको एरियाका डॉन हु हमारे सरदारजी के नाद को क्यु लग रहे हो, तुमको हम जिंदा नही छोडेंगे अशी जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शिवराज शितलसिंह परमार वय 40 वर्षे, व्यवसाय मुर्तीकार रा. महाराणा प्रतापसिंह नगर जुना कौठा, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 539/2022 कलम 307,386,452,427,506,34 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री महेश कोरे, मो. नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 3)जबरी चोरी :–

**नायगाव :–**दिनांक 03.09.2022 रोजी 19.00 वा. सुमारास, **मांजरम वाडी शिवार, ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे सासरवाडी मांजरम येथुन मौजे धानोरा गावाकडे मोसा वर बसून जात असतांना मांजरम वाडी शिवारात फॉरेस्ट जंगलात मांजरम ते धानोरा रोडवर दोन महिला रस्त्याने पायी जात असतांना त्यास साईड देण्यासाठी हार्ण वाजविला व गाडीची स्पीड कमी केली असता झुडपात बसलेले दोन पुरुष फिर्यादीचे पाठीमागुन येवुन फिर्यादीस डाव्या खांदयावर काठीने मारल्याने फिर्यादी गाडीवरुन खाली रोडचे दगडावर पडल्याने चेहऱ्यावर व डाव्या डोळयाजवळ मार लागला तेव्हा दोन महिला व दोन पुरुष यांनी फिर्यादीस मारहाण करुन फिर्यादीचे खिशातील नगदी 8000/– रुपये जबरीने काढुन घेतले व पळुन गेले. वगैरे **फिर्यादी माधव बालाजीराव जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. धानोरा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 130/2022 कलम 394,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री एस.एस. बाचावार, मो.क्र. 9637320355** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 01.09.2022 रोजी 16.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान, **जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा सि.डी. डिलक्स कंपनीची मो.सा. क्रं. एमएच.–26/डब्ल्यु–1467 किंमती 15,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी गजानन गंगाधरराव पाटील वय 39 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. हाडको, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 312/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री ईजळकर, मो.क्रं. 9970381047** हे करीत आहेत.

## 5)चोरीचा प्रयत्न :–

**इतवारा :–** दिनांक 04.09.2022 रोजी 03.30 वा. ते 04.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरा शेजारी जुनागंज इतवारा, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची त्यांचे ऑफिस समोर उभी केलेले ॲम्ब्युलन्स चे सायलंसर किंमती 15,000/–रुपयाचे काढुन बाजुला ठेवून चोरी करण्याचा प्रयत्न केला व दुसरी उभी असलेल्या गाडीचा काच फोडुन अंदाजे 10,000/–रुपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी महमद शोएब महमद खालेद, वय 31 वर्षे, व्यवसाय समाज सेवा रा. जुनागंज इतवारा,नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 248/2022 कलम 379,511,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/436 मोकले, मो.क्रं. 9423669795** हे करीत आहेत.

## 6)अंमली पदार्थ :–

**उस्माननगर** :– दिनांक 03.01.2022 रोजी 22.15 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहाते घरासमोरील अंगनात फुलमाळ तांडा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले राहाते घरा समोरील अंगनात एकुण वजन सहा किलो चारशे ग्रॅम गांजा किंमती 32,000/–रुपयाचे अंमली पदार्थ गांजाची झाडांची लागवड केली. वगैरे **फिर्यादी सपोनि पांडुरंग दिगंबर भारती, ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 155/2022 कलम 20 (अ) (ब), एनडीपीएस अधिनियम 1985 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री पल्लेवाड, मो.क्र. 7350756405** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)रामतीर्थ** :– दिनांक 04.09.2022 रोजी 02.10 वा. चे सुमारास, **महादेव मंदीर समोर सिमेंट चे कटयावर मौजे किनाळा ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 6440/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2441 प्रल्हाद मनु आडे, ने. पोस्टे. रामतीर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 141/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2079 तमलुरे, मो.क्र. 9834255985** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद** :– दिनांक 04.09.2022 रोजी 15.05 वा. चे सुमारास, **मौजे चिंचोली औंकार पटवारी यांच्या घरासमोर सार्वजनिक, रोडवर चिंचोली ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद अकरा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 10210/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री सय्यद आबेद गौसोद्दिन, ने. पोस्टे. धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 215/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2336 जाधव, मो.क्र. 9764574333** हे करीत आहेत.

**3)कुंटूर** :– दिनांक 04.09.2022 रोजी 17.45 वा. चे सुमारास, **मौजे वजिरगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 4270/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोह/1708 रमेश मोहनराव निखाते, ने. पोस्टे. कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 155/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1198 कंधारे, मो.क्र. 8856080025** हे करीत आहेत.

## 8)विषारी औषध पिवून आत्महत्या :–

**मुदखेड** :– दिनांक 29.08.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **मयताचे घरी मौजे वासरी ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष संभाजी उमाटे, वय 27 वर्षे, रा. वासरी ता. मुदखेड जि. नांदेड,** यांनी स्वतःचे घरी अतिवृष्टी शेतात अति पाऊस होवून शेत खरडून गेल्याने डोक्यावर टेन्शन घेवून रागाचे भरात कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना विष्णुपुरी येथे दाखल केले, उपचार चालु असताना मरण पावले. वगैरे **खबर देणार संजय दत्त उमाटे वय 26 वर्षे, व्यवसाय शेती रा. वासरी ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरी वरुन **पोस्टे मुदखेड** आ. मृ. 18/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोह/2255 कवठेकर, मो.नं. 8766442488** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड